वाचले:- १) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन)नियम-१९८२ -मधील नियम १०(१)
२) माध्य/शि/०१/काவि/७८२/२०२१दि.१८/१२/२००७
३) माध्य/शि/०१/कावि/७८२/२००७ दि.१८/१२/२००७
४) मा.आयुक्त सो.यांचेकडील अधिकार प्रदान आदेश प्रशा/२/कावि/४४७/२०१५ दि.२०/१०/१५
५) मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय रूपीनगर यांच्याकडील दि.१४/०७/२०२१ चे पत्र
६) दि.२३ - जुलै - २०२१ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माध्यमिक शिक्षण विभाग
माध्य/शि/०१/कावि/६३३/२०२१
दि.२३- जुलै -२०२१

विषय – नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीबाबत.
श्री.मारणे हनुमंत नथोबा ( मुख्याध्यापक ) संगणक क्र.७८८६

आदेश,

श्री.मारणे हनुमंत नथोबा हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर "मुख्याध्यापक" या पदावर माध्यमिक विद्यालय रूपीनगर या विद्यालयात कार्यरत आहेत. श्री.मारणे हनुमंत नथोबा हे दि.०३/१०/१९९६ रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागात रूजु झालेले आहेत.त्यांच्या सेवानोंद पुस्तकामधील नोंदी नुसार त्यांची जन्मतारीख १०/०८/१९६३ अशी असुन दिनांक-०९/०८/२०२१ रोजी त्यांच्या वयास ५८ वर्ष पुर्ण होत आहेत. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम -१९८२ मधील नियम १०(१) नुसार गट "क" मधील कर्मचा-यांना वयाची ५८ वर्ष पुर्ण होतील,त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमानानुसार मध्यानोत्तर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

श्री.मारणे हनुमंत नथोबा यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही.तसेच श्री.मारणे हनुमंत नथोबा यांचे कडून महानगरपालिकेस भुखंड कर्ज,घरबांधणी कर्ज,वाहन कर्ज, संगणक कर्ज,घर दूरूस्ती कर्ज, वैद्यकीय अग्रीम, कामगार कल्याण कर्ज तसेच माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित यांचेकडील कर्ज येणे बाकी नाही.भविष्यात इतर काही रक्कम येणे बाकी निघाल्यास सदर रक्कम श्री.मारणे हनुमंत नथोबा यांना मनपा कोषागरात भरणे बंधनकारक राहील,श्री.मारणे हनुमंत नथोबा "मुख्याध्यापक" यांना माध्यमिक शिक्षण विभागाकडील आदेश क्र.माध्य/शि/०१/कावि/७८२/२००७ दि.१८/१२/२००७ अन्वये सदरची सेवा सेवानिवृत्तीला धरणेबाबत सेवासातत्य देणेत आलेले आहे.तसेच सदर कालावधीचा फरक रक्कम रूपये २,७५,०००/- (अक्षरी रक्कम रूपये दोन लाख पंच्याहत्तर हजार रूपये फक्त) श्री.मारणे हनुमंत नथोबा यांना अदा करणेत आलेला आहे.तथापी सदर फरक रक्कम लेखापरिक्षण विभागाने वसुलपात्र दाखवणेत आलेली असल्याने सद्यस्थितीत सदर आक्षेपावर कार्यवाही चालु आहे,तरी याबाबत मुलेप विभागाच्या वसुलपात्र रक्कम रूपये -२,७५,०००/-(अक्षरी रक्कम रूपये दोन लाख पंच्याहत्तर हजार रूपये फक्त) व्याजसह वसुलीच्या अधिन राहून श्री.मारणे हनुमंत नथोबा मुख्याध्यापक यांना सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.श्री.मारणे हनुमंत नथोबा मुख्याध्यापक यांना मनपाकडुन मिळणारी रक्कम अदा करताना मुलेप विभागाचा नाहरकत दाखला घेणे किंवा आक्षेप निरस्त केलेबाबतचे पत्र माध्यमिक शिक्षण विभागास सादर करणे बंधनकारक राहील.

श्री.मारणे हनुमंत नथोबा यांना दि.०३/१०/१९९६ ते ११/०४/२००० अखेर वाचले क्र.०३ अन्वये सेवासातत्य देणेत आलेले असुन.सदरचे सेवासातत्य सेवानिवृत्तीला ग्राह्य धरणेबाबत नमुद करणेत आलेले आहे.त्यामुळे श्री.मारणे हनुमंत नथोबा मुख्याध्यापक यांची मनपा रूजु तारीख दि.०३/१०/१९९६ ही ग्राह्य धरून ३१/०८/२०२१ रोजी नियत वयोमानानुसार मनपा सेवेतुन सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

सबब,मी शिक्षणाधिकारी,माध्यमिक शिक्षण विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी-४११०१८ उपरोक्त वाचले क्र.०४ अन्वये विभाग प्रमुख म्हणून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन ) नियम-१९८२ मधील तरतूदी नुसार या आदेशान्वये श्री.मारणे हनुमंत नथोबा "मुख्याध्यापक" यांना मुलेप आक्षेप रक्कम रूपये -२,७५,०००/- व त्यावर



Scanned with CamScanner

येणा-या व्याजाच्या रक्कमेची वसुली करणेस अधिन राहून,दि.३१/०८/२०२१ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तूत आदेशाची सविस्तर नोंद श्री.मारणे हनुमंत नथोबा "मुख्याध्यापक" यांचे मुळ सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रती,
श्री.मारणे हनुमंत नथोबा "मुख्याध्यापक"
माध्यमिक विद्यालय रूपीनगर

प्रतः- १) लेखा शाखा
२) प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष,(प्रशासन) सेवाजेष्ठता कक्ष,मागासवर्गीय कक्ष,कामगार कल्याण विभाग
३) माध्यमिक विभाग टेबल क्रं. २ व ४
४) माध्यमिक विद्यालय रूपीनगर
२/- पुढील कार्यवाहीसाठी

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८


Scanned with CamScanner